# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : २६५५६७९९ फॅक्स : २६५५६८०५ ई.मेल :collectormsd@gmail.com

क्र.: सी/कार्या-२ आय/टे-८/कावि-नं. पवार/२०१९
दिनांक :१६/०३/२०२०

प्रति,
मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग,
कोंकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई

**विषय :** New Illegal slum development at chheda nagar reserved forest land near Jijamata Bhosale marg junction, Chembur, Mumbai...

**संदर्भ :** १.आपलेकडील पत्र क्र. मशा/कार्या-९/वने/नं.पवार/२०१९ दि. ७/६//२०१९ सोबत श्री. नंदकुमार पवार यांचा तक्रार ईमेल अर्ज दि. २२/०५/२०१९.
२. उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल दिनांक १५/०२/२०२०.

प्रस्तुत प्रकरणी आपलेकडील संदर्भ क्र. १ अन्वये श्री. नंदकुमार पवार यांची तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली असून ( आपलेकडील यादीतील क्र. ३१ कांदळवन अहवाल क्र. १६४/१० ) मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील रिट याचिका क्रमांक ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेल्या निर्णय त्यातील रुपांतरीत जनहित याचिका क्रमांक ८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कांदळवनाच्या -हासाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, मुंबई पुर्व उपनगर यांनी संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे अहवाल सादर करत आहे.

| अ.क्र. | तक्रारीचा विषय | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराचे नाव व दिनांक | श्री. नंदकुमार पवार |
| २ | तक्रारीचा विषय | New Illegal slum development at chheda nagar reserved forest land near Jijamata Bhosale marg junction, Chembur, Mumbai... |
| ३ | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा. स.नं. गावाचे नाव, तालुका | मौजे- चेंबूर ता. कुर्ला स.नं. ३२० |
| ४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | १. श्री. बाचकर, नायब तहसिलदार, कुर्ला<br>२. श्रीमती कुलकर्णी, मंडळ अधिकारी चेंबुर<br>३. श्री. अमोल सावंत, तलाठी माहूल |
| ५ | चौकशीमध्ये आढळून आलेली परिस्थिती | प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त नमूद अधिकारी यांनी स्थळपाहणी केली आहे. त्यानूसार मौजे चेंबूर , ता. कुर्ला येथील स.नं. ३२० पै. न.भू.क्र. ६६१ या शासकीय जमीनीवर असलेल्या कांदळवन क्षेत्रात अनधिकृत भराव करुन अंदाजे ३० ते ४० कच्च्या झोपडया बांधलेल्या आहेत. तसेच सदर जागेवर अनधिकृत वाचनाजय, गॅरेज असल्याचे दिसून आले. जागेवर अनधिकृत भराव झाल्याने खाडीच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बंद झाला असून नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहाअभावी कांदळवनाची झाडे सुकलेल्या अवस्थेत दिसून आली. साचलेल्या पाण्यामुळे देखील |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | कांदळवनाची हानी झालेली आहे.<br>सदर जागेच्या पुर्वेस कांदवन / दलदलीचे क्षेत्र, निवासी सोसायटया व पश्चिमेस घाटकोपर- मानखुर्द लिंक रोड, उत्तरेस पुर्व द्रुतगती महामार्ग व दक्षिणेस मानखुर्द लिंक रोड व दलदलीचे क्षेत्र आहे. आज रोजी नव्याने कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून येत नाही.<br>स.नं. ३२०पै. चे गाव अभिलेख ७/१२ पाहता कब्जेदार सदरी भारत सरकार ( साल्ट पॅन) अशी नोंद आहे. सदरचे क्षेत्र हे साल्ट पॅन विभागाच्या अखत्यारित येत असल्याने सदर क्षेत्राचे संरक्षण तसेच अनधिकृत झोपडया व अनधिकृत भराव करणेत प्रतिबंध / निर्बंध करण्यास सदर विभागामार्फत उपाययोजना करण्यात याव्यात असे या कार्यालयाचे मत आहे.<br>त्यानूसार यापुर्वीच मा. उपायुक्त ( मिठागर) यांना शासन निर्णयान्वये योग्य ती कार्यवाही करणेकामी कळविणेत आलेले आहे. तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी, कांदळवन संधारण घटक यांनी त्यांचेकडील दिनांक ०३/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये तक्रारीमध्ये नमूद ठिकाणावरील झोपडया निष्कासित करण्याची कारवाई दिनांक १७/०२/२०२० ते १८/०२/२०२० या कालावधीत करण्यात येणार असल्याबाबत कळविले आहे, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, मुंबई पुर्व उपनगर यांनी या कार्यालयास सादर केलेला आहे. . |
| ६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | सद्यस्थितीत स्थळपाहणीवेळी कुठेही नव्याने कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून आलेले नाही. |
| ७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलीस स्थानकाचे नाव | - |
| ८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नावे व पत्ता | - |
| ९ | कोणत्या कायद्याअंतर्गत/कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | - |

उपरोक्त प्रमाणे उपविभागीय अधिकारी, मुंबई पूव उपनगर यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व अनुषंगिक कागदपत्रे आपले माहितीसाठी सविनय सादर.

16/3

( वंदना गेवराईकर )
निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर

प्रत : मा. उपायुक्त ( मिठागरे ), एक्सचेंज इमारत, ४ था मजला, सर शि.रा. मार्ग,, बलार्ड इस्टेट, मुंबई-०१ यांना माहिती व आवश्यक त्या कारवाईसाठी.

२/- सदर तक्रारीमध्ये अर्जदार यांनी नमूद केलेली मिळकत ही आपले विभागाच्या अखत्यारीत आहे. त्या अनुषंगाने सदर प्रकरणी आपण कार्यवाही करुन मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांना अहवाल सादर करावा.

17/03/2020

Scanned by CamScanner